# नियमित दिवाणी दावा क्र.४१/२०२१ मधील अर्ज नि.क्र.८५ वरील आदेश

**CNRMHSN06000349-2020**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.६ व प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत विनंती केली आहे. अर्ज वाचलो.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की, सदर कामातील प्रतिवादी क्र.६ हे दिनांक १६/०८/२०१० रोजी व प्रतिवादी क्र.१३ हे दिनांक २०/११/२०१२ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.६ व १३ यांच्या मृत्युची माहिती वादी यांना दावा दाखल करताना नव्हती. तसेच जाणुनबुजून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता वादींनी टाळाटाळ केलेली नव्हती. कोरोना परिस्थितीमुळे व वारसांची माहिती मुदतीत न मिळालेने प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेता आले नसल्याचे कथन केले आहे. सबब त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जास नि.क्र.९३ कडे म्हणणे देवुन जोरदार विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादी यांचा अर्ज चालणेस पात्र नाही . वादींनी प्रस्तुतचा दावा २०२० साली दाखल केलेला आहे. वादींनी दावा दाखल करण्यापुर्वी ८ ते १० वर्षांपर्वी सदर प्रतिवादी क्र.६ व १३ मयत झालेले आहेत, असे असताना मयतांच्या नावे प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. अर्जामध्ये किती दिवसांचा विलंब झालेला आहे हे नमुद केलेले नाही. सबब त्यांनी वादीवर रक्कम रुपये ५ ,०००/– कॉस्ट बसवुन वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जामधील कथने वादीने शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादी क्र.६ हे दिनांक १६/०८/२०१० रोजी व प्रतिवादी क्र.१३ हे दिनांक २०/११/२०१२ रोजी मयत झालेले आहेत. वादीने सदरचा दावा वाटपाकरीता , कब्जाकरीता व हक्कज्ञापनाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.६ व प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस कोव्हीड–१९ या परिस्थितीमुळे अभिलेखावर आणता आले नसल्याचे दिसते . दाव्याचे

स्वरुप पाहता, प्रतिवादी क्र.६ व प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस अभिलेखावर आल्यास इतर प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. अर्ज मंजुर केल्यास दाव्याचा अंतिम गुणदोषावर न्यायनिर्णय देण्यास मदत होणार आहे. वादी यांना प्रतिवादी क्र .६ व १३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास जो विलंब झालेला आहे, तो त्यांनी जाणीवपुर्वक केलेला आहे, असे दिसुन येत नाही. सदरचा विलंब हा नि.क्र.८१ वरील अर्जावरील आदेशाने माफ केलेला आहे. सबब वादीस प्रतिवादी क्र.६ व १३ यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीस प्रतिवादी क्र.६ व प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादीने आवश्यक ती दुरुस्ती दाव्यात मुदतीत करुन घ्यावी.

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )**

दि. ०७/०४/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav (L.G.) |
| Court. | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date. | : | 07/04/2022 |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 07/04/2022 |
| Order uploaded on. | : | 08/04/2022 |